पोलीस अधिक्षक कार्यालय, गडचिरोली

दिनांक २०/०७/२०१८

# वार्तापत्र

## नक्षलवाद्यांनी खुन केलेल्या इसमाचे गावक-यांनी बांधले स्मारक

उपविभाग सिरोंचा अंतर्गत मौजा निमडा येथील रहिवासी लक्ष्मीस्वामी किष्टीया साकटी वय २७ वर्ष या युवकाच्या राहत्या घरी दिनांक ३०/१२/२००६ रोजी रात्री सशस्त्र नक्षलवाद्यांनी येउन ''गडचिरोली पोलीस तुला भेटायला आले आहेत.'' असे खोटे सांगुन घरातुन त्यास सोबत घेवुन जात जवळच्याच जंगलात नेवुन तू पोलीस भरतीला का गेलास? अशी विचारणा करुन अत्यंत निर्दयतेने मानेवर कु-हाडीचे घाव घालुन खून केला.

लक्ष्मीस्वामी साकटी यांचे स्मरणार्थ निमडा येथील गावक-यांनी त्याचे स्मारक बांधुन त्याला श्रध्दांजली वाहुन नक्षलवादयांचा निषेध करत नक्षलविरोधात घोषणा दिल्या.

नक्षलवादी हे निष्पाप आदिवासी युवकांचा क्रुरपणे खुन करत असतात. यातुन त्यांच्या क्रुरवृत्तीचे दर्शन घडते. तसेच ते आम्हाला शासनाची कोणतीही मदत मिळु नये किंवा आमची तरुण मुले-मुली यांनी शिक्षण घेवु नये. त्यांना नोकरी मिळु नये यासाठी बंदुकीचा वापर करुन आमचा व आमच्या भागाचा विकास होवु देत नाही अशी भावना उपस्थितांनी यावेळी व्यक्त केली.